**फौ. कि. अ. क्र. ६४७/२०२१**
**(तबस्सुम बागवान वि. वहाब बागवान)**

## निशाणी क्र. ०६ खाली आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने दरम्यानची पोटगी मिळण्याकरिता दाखल केला आहे.

०२) अर्जदाराचे थोडक्यात कथन असे आहे की, सदरचा अर्ज कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा कलम २००५ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे. सामनेवाला क्र. १ ते ४ यांनी अर्जदार हिचा छळ, जाचहाट करुन अर्जदार हिस शारिरीक, मानसिक त्रास देवून अकारण माहेरी हाकलून लावले आहे अशी निशाणी क्र. १ वरुन तक्रार केली आहे. तसेच अनेक प्रयत्न करुनही अर्जदार हिस सामनेवाला क्र. १ ने नांदविण्यास नेले नाही. सामनेवाला क्र.१ यांने अर्जदार हिच्या पोटापाण्याची, कपडेलत्त्यांची, औषधोपचाराची, चरितार्थाची कोणतीही सोय केलेली  नाही. अर्जदार हिस कोणत्याही प्रकारचे उत्पन्नाचे साधन नाही. सामनेवाला यांची सांपतीक स्थिती अतिशय उत्तम आहे. त्याचे येडशी, ता. उस्मानाबाद येथे सिमेंट पोल फॅकट्री असून त्यापासून त्याला दरमहा ५०,०००/– उत्पन्न मिळते. तसेच बार्शी येथे २५ एकर शेतजमीन असून त्यापासून २०,००,०००/– दरसाल उत्पन्न मिळते. तसेच वॉटर कॅण्ड स्पलाय असून त्यापासून दरमहा ५०,०००/– रुपये उत्पन्न मिळते. बार्शी येथे स्वतःचा बंगला आहे, त्यात भाडेकरु असून त्यापासून दरमहा ३०,०००/– मिळते. दुकानगाळे, दोन टमटम, एक कार, जीप, ट्रक ही वाहने असून त्यापासून ३,००,०००/– रुपये उत्पन्न मिळते. सामेनवालाची आर्थिक परिस्थिती चांगली असूनही तो अर्जदाराचा सांभाळ करत नाही. अर्जदार तिचा व मुलीचा सांभाळ करण्यास असमर्थ आहे. सबब, दरमहा २०,०००/– रुपये दरम्यान पोटगी देण्याचा आदेश व्हावा असे कथन केले आहे.

०३) सामनेवाला यांनी निशाणी क्र. १२ कडे म्हणणे दाखल करुन अर्जदाराचा अर्ज नाकारला आहे. अर्जदार ही हट्टी व चिडखोर असून तिच्या हट्टीपणामुळे ती सामनेवाला क्र. १ ला सोडून गेली. सामनेवाला क्र. १ ने तिला नांदायला येण्यासाठी खुप प्रयत्न केले, मात्र तरीही अर्जदार नांदायला आली नाही. अर्जदाराने सामनेवाला क्र. १ कडून तलाक मिळण्यासाठी नोटीस पाठविली आहे. ती विनाकारण १४/०९/२०१५ रोजी माहेरी निघून गेली. तिने स्वतःहून सामनेवाला क्र. १ चा त्याग केलेला आहे. अर्जदाराचा अर्ज खोटा असून महिला समोपदेशन केंद्राने देखील अर्जदाराच्या अर्जावर कारवाई केलेली नाही. सामनेवाला क्र. १ ने त्याच्या उत्पन्नाबाबतचा संपुर्ण मजकूर नाकारला आहे व अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४)　अर्जदारातर्फे वकील श्री. शेख व सामनेवालातर्फे वकील श्री. शेख यांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज, प्रतिज्ञापत्र, म्हणणे तसेच मालमत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. तसेच अर्जदाराने निशाणी क्र. ४ कडील कागदपत्रांच्या यादीसोबत व निशाणी क्र. १९ कडील कागदपत्रांच्या यादीसह दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

०५)　सामनेवाला याने अर्जदार त्याची पत्नी असल्याचे नाकारले नाही. तसेच अर्जदाराने सामनेवाला क्र. १ पासून जोया नावाची मुलगी असल्याचे नाकारले नाही. अर्जदार ही तिच्या मुलीही १४/०९/२०१५ पासून तिच्या माहेरी गेल्याचे कबुल केले. अशा परिस्थितीत अर्जदार ही मुलगी जोया हिच्या दिनांक १४/०५/२०१५ पासून सामनेवाला क्र. १ पासून विभक्त राहत असल्याचे शाबीत झाले.

०६)　अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये सामनेवाला यांनी छळ करुन माहेरी पाठविल्याचे नमुद केले आहे. सदरची बाब सामनेवाला यांनी नाकारली आहे. मात्र सामनेवाला क्र. १ याचे अर्जदाराच्या पूर्वी एक लग्न झाल्याचे त्याने त्याच्या म्हणण्यमध्ये कबुल केले. अशा परिस्थितीमध्ये अर्जदार व सामनेवाला यांच्या मध्ये कौटुंबिक वाद असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. अर्जदाराच्या अर्जामधील व प्रतिज्ञापत्रातील कथनांवरुन तिचा कौटुंबिक छळ होत असल्याचे प्रथमदर्शनी शाबीत होत आहे.

०७)　प्रस्तुत प्रकरणी अर्जदार व सामनेवाला यांचे नाते कबुल आहे.  प्रस्तुतचा अर्ज हा अंतरिम पोटगी मिळण्यासाठीचा असल्याने अर्जामध्ये दाखल सर्व कागदपत्रे व वादकथन यांचे प्रथमदर्शनी अवलोकन केले आहे. अर्जदार  व सामनेवाला या दोघांमध्ये वाद असल्याचे मुळ अर्ज व त्यावरील म्हणणे या वरुन स्पष्ट दिसून येते. तसेच अर्जदार व सामनेवाला यांनी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले आहेत, जे की पुरावा घेतल्याशिवाय स्पष्टरितीने शाबीत होणार नाही.

०६)　दोन्ही पक्षकारांमध्ये नाते कबुल असल्याने त्याबाबत या घडीला वाद नाही. प्रस्तुत प्रकरणी अर्जदार ही माहेरी राहते ही बाब कबुल आहे. अशा परिस्थितीत अर्जदाराचा ती माहेरी गेल्यापासून तिचा सांभाळ केल्याचे सामनेवाला यांचे कथन नाही.  उलट अर्जदाराने तिच्या अर्जाद्वारे सामनेवाला यांनी तिच्या सोबत कौटुंबिक हिंसाचार केल्याचे व त्यामुळे ती माहेरी राहत असल्याचे प्रथमदर्शनी शाबीत केले आहे. अशा प्रसंगी सामनेवाला क्र. १ याने अर्जदार हिचा पती म्हणून सांभाळ करणे कायद्याने अपेक्षित आहे.

०७)   सामनेवाला हे सिमेंट पोल फॅक्टरीचा व्यवसाय करत असल्याबाबत तसेच त्यांनी २५ एकर बागायती शेती असल्याबाबत अर्जदाराचे कथन आहे. सामनेवाला क्र. १ याने त्याच्या प्रतिज्ञापत्रात तो मजूरी करत असल्याबाबत व त्याचे मासिक उत्पन्न १५,०००/– असल्याबाबत कथन केले आहे. मात्र निशाणी क्र. १९ कडील यादीसोबत दाखल केलेल्या उपळाई (ठो), ता. बार्शी येथील गट नं. ५८६ व गट नं. १००१ चे ७/१२ च्या उताऱ्यांचे अवलोकन केले असता सामनेवाला क्र. १ यांचे वडील याकूब बागवान यांच्या नावे गट नं. ५८६ मध्ये ५ हे. १४ आर. व गट नं. १००१ मध्ये समाईकात ५ हे. ६२ आर जमीन असल्याचे त्यावरुन दिसून येते. तसेच येडशीकर सिमेंट आर्टिकल्स या नावाने येडशी येथे सामनेवाला यांचे दुकान असल्याबाबत एक फोटो दाखल केला आहे. या वरुन सामनेवाला यांच्याकडे शेतजमिनी असल्याचे व त्या बागायती असल्याचे दिसून येते. सामनेवाला क्र. १ हा त्याच्या वडिलांच्या घरी राहत असल्याचे त्याने प्रतिज्ञापत्रात नमुद केले. त्यामुळे तो वडिलांसोबत व्यवसाय करत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. अशा परिस्थितीत सामनेवाला हा केवळ रक्कम रुपये १५,०००/– मिळवितो असे दिसून येत नाही. अर्जदाराने निशाणी क्र. १९ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता सामनेवाला याची आर्थिक परिस्थिती चांगली असल्याचे दिसून येते. त्यामुळे सामनेवाला क्र.१ याने अर्जदार यांना अंतरिम पोटगी म्हणून दरमहा ८,०००/– रुपये अर्ज दाखल तारखेपासून द्यावी असा आदेश केल्यास योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१) अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२) सामनेवाला क्र. १ याने अर्जदार यांना दरमहा रक्कम रुपये ८,०००/–(रक्कम रुपये आठ हजार मात्र) दरम्यानची पोटगी म्हणून अर्ज दाखल तारखेपासून द्यावी.

३) दोन्ही पक्षकारांनी मुळ अर्ज जलदगतीने चालवावा असा आदेश करण्यात येत आहे.

४) प्रस्तुत अर्जाचा खर्च पक्षकारांनी आपआपला सोसावा.

५) प्रस्तुत आदेशाची प्रत अर्जदार हिला विनामुल्य देण्यात यावी.

(खुल्या न्यायालयात जाहीर.)

( एम. आर. कामत )

दिनांकः–३०/०८/२०२२.          ३ रे न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, पंढरपूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment / Order.

| | | |
|---|---|---|
| a) Court | : | 3rd Jt. C. J. J. D. & J. M. F. C. Pandharpur |
| b) Name of Stenographer | : | S. M. Shaikh,. |
| c) Date | : | 30/08/2022. |
| d) Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 30/08/2022. |
| e) Judgment/Order uploaded on | : | 03/09/2022. |